दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस
• बुधवार दि ६ मे २०२६ •

# प्रभावी पर्यावरण संवर्धन समन्वयातूनच शक्य

## शिवाजी विद्यापीठातील गोलमेज परिषदेतील सूर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर, दि. ५ मे:** पर्यावरणाशी संबंधित कार्यरत संस्था, संघटनांनी समन्वय आणि सहकार्यातून एकत्रित काम केल्यास प्रभावी पर्यावरण संवर्धन शक्य आहे, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात झालेल्या गोलमेज परिषदेत उमटला.

शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग, विद्यापीठ विकास मंच आणि कोल्हापूर अर्थ वॉरियर्स यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात ही परिषद झाली.

या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून 'दै. सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनामध्ये जनजागृतीचे महत्त्वाचे साधन म्हणून प्रसारमाध्यमांची भूमिका अनन्यसाधारण असल्याचे सांगून ते म्हणाले, पर्यावरण संवर्धन ही आपल्या अस्तित्वाशी निगडित महत्त्वाची बाब आहे. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांची झपाट्याने होणारी घट ही गंभीर संकटे आपल्यासमोर उभी आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमे या प्रश्नाकडे समाजाचे सातत्याने लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. वृक्षारोपण, पाणीसंवर्धन आणि प्लास्टिकविरहित उपक्रम यांसारख्या कृतींमध्ये सहभागी होणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पर्यावरण टिकले, तरच भावी पिढ्यांना सुरक्षित आणि समृद्ध जीवनाची हमी आपण देऊ शकू, अन्यथा नाही.

अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन या बाबींना विद्यापीठाने नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. यामुळेच जलसंवर्धनाच्या माध्यमातून आज शिवाजी विद्यापीठ पूर्णपणे जलस्वयंपूर्ण झाले आहे. येथून पुढेही पर्यावरणीय संरक्षणासाठी विद्यापीठ नेहमीच सकारात्मक प्रयत्न करत राहील, असेही त्यांनी सांगितले.

गोलमेज परिषदेत विविध पर्यावरणीय मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. विशेषतः पाण्याचे प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, वृक्षतोड, प्लास्टिक संकलन, बांधकामातील खर मातीच्या व्यवस्थापनाबाबतचे प्रश्न यांसारख्या विषयांवर सहभागी संस्था प्रतिनिधींनी विचार मांडले. पर्यावरणाचे प्रश्न सोडवताना पर्यावरणविषयक कायदेशीर बाबींचा योग्य अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः तसेच घनकचरा व्यवस्थापन कायदा, २०२६ समजून घेऊन सध्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले. पर्यावरणीय प्रश्नांबाबत प्रशासनाकडून माहिती मिळविण्यासाठी माहितीचा अधिकार वापरण्यासही हरकत नसल्याचे सांगण्यात आले. पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी सर्व संस्थांनी एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता या निमित्ताने अधोरेखित झाली. विद्यापीठाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून प्रभावी कृती आराखडा तयार करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या परिषदेमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीला नवी दिशा मिळेल आणि विविध संस्थांमध्ये समन्वय वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

परिषदेत जिल्ह्यातील वृक्षप्रेमी वेल्फेअर, निरोगी व पर्यावरणपूरक प्रतिष्ठान, निसर्ग अंकुर, गार्डन्स क्लब, वसुंधरा निसर्ग संरक्षण संस्था, सजग नागरिक मंच, कल्पवृक्ष ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, सायकल वेडे कोल्हापूर आदी १६ स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी मांडली. कार्यक्रमास पर्यावरण शास्त्र विभागातील डॉ. सोनल चोंडे, डॉ. पल्लवी भोसले यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे कोल्हापूर अर्थ वॉरियर्सच्या तृप्ती देशपांडे यांनी आभार मानले.

0 6 MAY 2026
सकाळ

# विभागीय क्रीडा परिषदेची राधानगरीत अंतिम सभा

## पुढील यजमानपद मिळाले जयसिंगपूरला

राधानगरी, ता. ५ : येथील राधानगरी महाविद्यालयात २०२५-२६ मधील शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषदेची अंतिम सभा उत्साहात पार पडली. यंदाच्या परिषदेचे यजमानपद राधानगरी महाविद्यालयाकडे होते. विभागातील सर्व महाविद्यालयांच्या संघांनी विविध २३ क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. पुढील वर्षाचे यजमानपद जयसिंगपूर येथील जे. जे. मगदूम इंजिनिअरिंग कॉलेजकडे सोपविण्यात आले.

सभेची सुरुवात रोपाला पाणी घालून संस्थेचे उपाध्यक्ष मोहन नेवडे, शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, सभाध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण चव्हाण, डॉ. विश्वास पाटील, डॉ. सुनील चव्हाण, डॉ. विकास जाधव आणि परिषदेचे सचिव डॉ. नीलेश पाटील यांच्याहस्ते झाली. सभेत आयोजक महाविद्यालयाला गौरविण्यात आले. विविध विषयांचे वाचन करून बजेटला मान्यता देण्यात आली. प्रा. डॉ. नीलेश पाटील यांनी स्वागत केले. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. तौफिक नायकवडे यांनी आभार मानले. डॉ. संग्राम पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

06 MAY 2026

जनप्रवास

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध पदवी, पदव्युत्तर व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी १० जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत, अशी माहिती प्र. संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. या प्रवेश प्रक्रियेत बीए, बीकॉम तसेच एमए (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एमकॉम, एमएस्सी (गणित), एमबीए यासारख्या दूरशिक्षण अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच ऑनलाईन पद्धतीने एमबीए, एमकॉम व एमएस्सी (गणित) हे अभ्यासक्रम उपलब्ध असून विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांनाही प्रवेश दिला जाणार आहे.

डॉ. कृष्णा पाटील म्हणाले, प्रवेशासंदर्भातील शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Distance Education या लिंकवर उपलब्ध आहे. तसेच https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg/#/loginया ऑनलाइन लिंकद्वारे विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित करावा. नियमित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दुहेरी पदवी घेण्याचीही संधी उपलब्ध आहे.

0 6 MAY 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# समन्वयातूनच प्रभावी पर्यावरण संवर्धन शक्य

- शिवाजी विद्यापीठातील गोलमेज परिषदेतील सूर
- प्रभावी कृती आराखडा तयार करण्याचा निर्धार
- पर्यावरणीय मुद्द्यांवर सखोल चर्चा

जनप्रवास : कोल्हापूर

पर्यावरणाशी संबंधित कार्यरत संस्था, संघटनांनी समन्वय आणि सहकार्यातून एकत्रित काम केल्यास प्रभावी पर्यावरण संवर्धन शक्य आहे, असा सूर मंगळवारी शिवाजी विद्यापीठात झालेल्या गोलमेज परिषदेत उमटला. शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग, विद्यापीठ विकास मंच आणि कोल्हापूर अर्थ वॉरियर्स यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात ही परिषद झाली.

या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार निखिल पंडितराव उपस्थित होते. यावेळी पर्यावरण संवर्धनामध्ये जनजागृतीचे महत्त्वाचे साधन म्हणून प्रसारमाध्यमांची भूमिका अनन्यसाधारण असल्याचे सांगितले. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन या बाबींना विद्यापीठाने नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. यामुळेच जलसंवर्धनाच्या माध्यमातून आज शिवाजी विद्यापीठ पूर्णपणे जलस्वयंपूर्ण झाले आहे. येथून पुढेही पर्यावरणीय संरक्षणासाठी विद्यापीठ नेहमीच सकारात्मक प्रयत्न करत राहील, असेही त्यांनी सांगितले.

गोलमेज परिषदेत विविध पर्यावरणीय मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. विशेषतः पाण्याचे प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, वृक्षतोड, प्लास्टिक संकलन, बांधकामातील खर मातीच्या व्यवस्थापनाबाबतचे प्रश्न यांसारख्या विषयांवर सहभागी संस्था प्रतिनिधींनी विचार मांडले. पर्यावरणाचे प्रश्न सोडवताना पर्यावरणविषयक कायदेशीर बाबींचा योग्य अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः तसेच घनकचरा व्यवस्थापन कायदा, २०२६ समजून घेऊन सध्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले.

परिषदेत जिल्ह्यातील वृक्षप्रेमी वेल्फेअर, निरोगी व पर्यावरणपूरक प्रतिष्ठान, निसर्ग अंकुर, गार्डन्स क्लब, वसुंधरा निसर्ग संरक्षण संस्था, सजग नागरिक मंच, कल्पवृक्ष ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, सायकल वेडे कोल्हापूर आदी १६ स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले. पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी मांडली. कार्यक्रमास पर्यावरण शास्त्र विभागातील डॉ. सोनल चोंडे, डॉ. पल्लवी भोसले यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. कोल्हापूर अर्थ वॉरियर्सच्या तृप्ती देशपांडे यांनी आभार मानले.

### समन्वय वाढण्यास मदत

या परिषदेमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीला नवी दिशा मिळेल आणि विविध संस्थांमध्ये समन्वय वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

06 MAY 2026

सिंधुदुर्ग समाचार

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध पदवी, पदव्युत्तर व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी दि. १० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत, अशी माहिती प्र. संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

या प्रवेश प्रक्रियेत बी.ए., बी.कॉम. तसेच एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. यांसारख्या दूरशिक्षण अभ्यासक्रमांचा समावेश आहे. तसेच ऑनलाईन पद्धतीने एम.बी.ए., एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) हे अभ्यासक्रम उपलब्ध असून विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांनाही प्रवेश दिला जाणार आहे.

डॉ. कृष्णा पाटील म्हणाले की, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या, अपूर्ण शिक्षण असलेल्या तसेच शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रातील कर्मचारी, उद्योजक, शेतकरी, गृहिणी, कामगार, सैनिक आदी सर्व घटकांसाठी ही एक उत्तम संधी आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यभरातील ८६ अभ्यासकेंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रवेशासंदर्भातील सविस्तर माहिती शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Distance Education या लिंकवर उपलब्ध आहे. तसेच https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg/#/loginया ऑनलाइन लिंकद्वारे विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित करावा.

नियमित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दुहेरी पदवी (Dual Degree) घेण्याचीही संधी उपलब्ध आहे. त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राशी किंवा नजीकच्या अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

06 MAY 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रभावी कृतीतून करणार पर्यावरण संवर्धन

## विद्यापीठातील गोलमेज परिषदेत निर्धार; विविध स्वयंसेवी संस्थांचा सहभाग

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ५ : प्रभावी कृती आराखडा तयार करून त्याच्या माध्यमातून सक्रियपणे योगदान देत कोल्हापुरातील पर्यावरण संवर्धन करण्याचा निर्धार आज शिवाजी विद्यापीठातील गोलमेज परिषदेत करण्यात आला. पर्यावरणाशी संबंधित कार्यरत संस्था, संघटनांनी समन्वय व सहकार्यातून एकत्रित काम केल्यास अधिक ताकदीने पर्यावरण संवर्धन शक्य असल्याचा सूर यावेळी चर्चेतून उमटला.**

विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग, विद्यापीठ विकास मंच, कोल्हापूर अर्थ वॉरियर्स यांच्यातर्फे पर्यावरणविषयक प्रश्नांबाबत विद्यापीठाच्या एजीपीएम विभागाच्या सभागृहात गोलमेज परिषद घेण्यात आली.

या परिषदेचे उद्‍घाटन 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तर पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, कोल्हापूर अर्थ वॉरियर्सचे आशीष कोंगलेकर प्रमुख उपस्थित होते.

पंडितराव यांनी, पर्यावरण संवर्धनात 'सकाळ'ने राबविलेल्या पंचगंगा स्वच्छता मोहीम, मूठभर रक्षा, प्लास्टिक संकलन, जलतीर्थ स्वच्छता मोहीम, आदी उपक्रमांची माहिती दिली. पर्यावरण संवर्धनामध्ये जनजागृतीचे महत्त्वाचे साधन म्हणून प्रसारमाध्यमांची भूमिका अनन्यसाधारण असल्याचे त्यांनी सांगितले. प्रसारमाध्यमे या प्रश्नाकडे समाजाचे सातत्याने लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. पर्यावरण टिकले तरच भावी पिढ्यांना सुरक्षित आणि समृद्ध जीवनाची हमी आपण देऊ शकू, अन्यथा नाही. वृक्षारोपण, पाणीसंवर्धन आणि प्लास्टिकविरहित उपक्रम यांसारख्या कृतींमध्ये सहभागी होणे, ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी पर्यावरणविषयक गोलमेज परिषदेत 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव यांचे स्वागत पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी केले. यावेळी शेजारी तृप्ती देशपांडे, आशीष कोंगलेकर उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. जाधव यांनी गोलमेज परिषद घेण्यामागील भूमिका मांडली. या परिषदेत विविध पर्यावरणीय मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. पाणी प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, वृक्षतोड, प्लास्टिक संकलन, बांधकामातील खरमातीच्या व्यवस्थापनेबाबतच्या प्रश्नांवर उपस्थितांनी मते मांडली.

यावेळी कोल्हापूर अर्थ वॉरियर्सचे अभिजित कुलकर्णी, सुहास बट्टेवार, स्माईलिंग अर्थच्या संगीता कोकितकर, वृक्षप्रेमी वेल्फेअरचे अमोल बुड्ढे, सर्जन निरोगी व पर्यावरणपूरक प्रतिष्ठानचे डॉ. बी. आर. कोरे, गार्डन्स क्लबच्या पल्लवी कुलकर्णी, निसर्ग अंकुरचे डॉ. हरीश नांगरे, विद्यापीठ विकास मंचचे ॲड. स्वागत परुळेकर, अधिसभा सदस्य डॉ. उषा पवार, जनस्वास्थ्य दक्षता समितीचे दीपक देवलापूरकर, विज्ञान प्रबोधिनीचे उदय गायकवाड, सजग नागरिक मंचच्या रसिया पडळकर, ज्ञानज्योती फाउंडेशनचे एम. डी. पाटील, 'केवीके'च्या डॉ. प्रिया मोहिते, कल्पवृक्ष डेव्हलपमेंट ट्रस्टचे राजाराम शिंदे, वसुंधरा निसर्ग संरक्षण संस्था, सायकल वेडे संघटनेचे प्रतिनिधी, डॉ. सोनल चोंडे, पल्लवी भोसले उपस्थित होते. कोल्हापूर अर्थ वॉरियर्सच्या तृप्ती देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

### पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक

■ 'पर्यावरण संवर्धन' ही आपल्या अस्तित्वाशी निगडित महत्त्वाची बाब आहे. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांची झपाट्याने होणारी घट ही गंभीर संकटे आपल्यासमोर उभी आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक असल्याचे पंडितराव यांनी सांगितले.

### परिषदेत काय ठरले?

- पहिल्या टप्प्यात घनकचरा व्यवस्थापन, वृक्षलागवडीबाबत संघटितपणे कार्यरत राहणे.
- पर्यावरणाचे प्रश्न सोडविताना कायदेशीर बाबींचा योग्य अभ्यास करणे.
- पर्यावरण चळवळीला नवी दिशा देण्यासाठी संस्थांमध्ये समन्वय वाढविणे.
- वर्षभर विविध उपक्रमांतून पर्यावरण संवर्धनाबाबत जागृती करणे.

06 MAY 2026 कुमारज्योती


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# टाइम्स एशिया रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाची भरारी

## प्रथम सहभागातच राज्य विद्यापीठांत देशात दहावे स्थान

**कोल्हापूर** : जागतिक स्तरावर विद्यापीठ गुणवत्तेचे मुल्यांकन करणाऱ्या टाईम्स हायर एज्युकेशन एशिया २०२६ या मानांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास उत्तुंग यश मिळाले आहे. हे मुल्यांकन विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन वातावरण व गुणवत्ता, आंतरराष्ट्रीयकरण, उद्योग- शिक्षण; सहकार्य या पंचसुत्रीवर आधारित असते. भारतातील एकूण सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत दहावे आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक राज्य विद्यापीठांत दुसरे मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामध्ये महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ या सार्वजनिक राज्य विद्यापीठांचाच समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठाने या मुल्यांकनामध्ये प्रथमच सहभाग नोंदवून या प्रतिष्ठित मुल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठाला ३६ देशांतर्गत आशिया स्तरावरती ४०१-५०० या



मानांकन बँडमध्ये स्थान प्राप्त झाले आहे. या एशिया स्तरावरील पहिल्या ५०० मानांकनप्राप्त विद्यापीठांमध्ये भारतातील जवळपास ६६ भारतीय संस्था असून यामध्ये १९ भारतीय सर्वोच्च संशोधन संस्था, ०९ केंद्रीय विद्यापीठे, १० सार्वजनिक राज्य विद्यापीठे व २८ खाजगी / स्वायत्त विद्यापीठांचा समावेश आहे. या मुल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास भारतीय स्तरावर एकूण विद्यापीठांअंतर्गत १३ वी मानांकन बँड आणि सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत ५ वी मानांकन बँड प्राप्त झाली आहे. या संदर्भात कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी विद्यापीठातील सर्व घटकांचे अभिनंदन केले. भारतातील इतर सार्वजनिक राज्य विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठ हे गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि समाजाभिमुख कार्य या सर्व बाबींमध्ये आघाडीवर असल्याचे या मानांकनामधून स्पष्ट झाले आहे.

### राज्य व देशासाठी अभिमानास्पद

पहिल्याच प्रयत्नात मिळालेले हे मानांकन विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कामगिरीची साक्ष देणारी असून यामुळे विद्यापीठाची जागतिक स्तरावरील ओळख अधिक दृढ झाली आहे. हे अभिमानास्पद व ऐतिहासिक यश विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संविधानिक अधिकाऱ्यांचे पाठबळ, शिक्षकांचे सातत्यपूर्ण संशोधन व अध्यापन, विद्यार्थ्यांची एकूण गुणवत्ता, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सहभाग आणि इतर सर्व संबंधित घटकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे. हे यश विद्यापीठासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्य व देशासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 MAY 2026
तरुण भारत

लक्षवेधी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे यांचे प्रतिपादन

# बांधावरील झाडे म्हणजे मुदतबंद ठेव

। त. भा. वार्ताहर

**वाशी :** शेतीच्या बांधावर लावलेली झाडे ही केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाहीत, तर ती शेतकऱ्यांसाठी संकटाच्या काळातील 'फिक्स्ड डिपॉझिट' (मुदत ठेव) ठरतात. शाश्वत शेती आणि आर्थिक स्थैर्यासाठी शेतकऱ्यांनी बांधावर वृक्षलागवड करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले कुडू (ता. करवीर) येथील शाश्वत फाउंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'बांधावरची झाडे आणि त्यांचे फायदे' या विषयावर त्यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी भोगावती




**वाशी : व्याख्यानमालेत बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे भोगावती.**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एम. पाटील होते.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, लावलेली झाडे मोकाट जनावरे आणि जोराच्या वाऱ्यापासून शेताचे संरक्षण करतात. तसेच जमिनीची धूप थांबवण्यासाठी या झाडांच्या मुळांचा मोठा उपयोग होतो. झाडांमुळे शेतीमधील सूक्ष्म हवामान टिकून राहते. मित्रकिडींचे वास्तव्य वाढल्याने पिकांवरील रोगराई कमी होण्यास मदत होते. आंबा, जांभूळ, साग, बांबू किंवा कडुनिंबासारखी झाडे बांधावर लावल्यास काही वर्षांनंतर त्यातून मोठे आर्थिक उत्पन्न मिळते. मुलांचे शिक्षण किंवा लग्नासारख्या मोठ्या खर्चासाठी ही झाडे मोलाची मदत करतात. झाडांच्या पालापाचोळ्यामुळे जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढतो, ज्यामुळे जमिनीची सुपीकता सुधारते.

भोगावती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एम. पाटील म्हणाले, शेती आता शाश्वत राहिली नाही. शेतातील बांधामुळे जमिनीचे होणारी धूप आणि पाणी व्यवस्थापन योग्य पद्धतीने होते. आपल्या परिसरामध्ये ऊस शेती मोठ्या प्रमाणात घेतली जाते. त्यापासून मिळणारे उत्पन्न अत्यंत अल्प आहे. यावेळी शाश्वत फाऊंडेशनचे पदाधिकारी प्रभाकर पाटील, अमर पाटील, यशवंत पाटील, सतीश पाटील परिसरातील प्रगतशील शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 6 MAY 2026
तरुण भारत



कोल्हापूर : डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन करताना प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**त. भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती मंगळवारी शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठ अतिथीगृहासमोरील आणि विद्यार्थी भवन येथील डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पुतळ्यास मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सी. टी. पवार, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. टी. के. सरगर, डॉ. किसन कुराडे, डॉ. अशोकराव जगताप, डॉ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, विद्यार्थी भवनचे रेक्टर डॉ. दीपक भादले, डॉ. माधुरी वाळवेकर, सुरेखा अडके, डॉ. प्रियांका जाधवर, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, गजानन पळसे, आजी–माजी विद्यार्थी उपस्थित होते.

0 6 MAY 2026

पुढारी

# डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

06 MAY 2026
सकाळ

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांना जयंतीनिमित्त मंगळवारी अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तत्पूर्वी, विद्यापीठ अतिथीगृहासमोरील आणि विद्यार्थी भवन येथील डॉ. पवार यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

महा
न्यूज & व्ह्यूज




# विज्ञानवादाशिवाय सामाजिक परिवर्तन अशक्य : डॉ. प्रकाश पवार

**कोल्हापूर, ( महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज) :**

विज्ञानवादी विवेकनिष्ठ विचारसरणीचा प्रसार हा सामाजिक परिवर्तनासाठी अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश पवार आज केले. आ'लोकशाही वाहिनीवरील डॉ. भालचंद्र काकडे स्मृती व्याख्यानमालेत ते 'भारताचा विज्ञानवाद' या विषयावर बोलत होते. आपल्या व्याख्यानात त्यांनी भारतीय समाजातील अंधश्रद्धा, परंपरा आणि आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्यातील संघर्ष अधोरेखित केला.

महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या विचारांमधून विज्ञानवादी परंपरेचा विकास त्यांनी स्पष्ट केला.



विवेकनिष्ठा, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा संगमच भारताच्या प्रगतीचा पाया असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले.

डॉ. प्रकाश पवार यांनी भारतीय समाजरचनेतील विचारपरंपरा आणि वैज्ञानिक दृष्टी यांचा सखोल परामर्श घेतला. त्यांनी सांगितले की, विज्ञानवाद म्हणजे केवळ तांत्रिक प्रगती नसून ती एक जीवनदृष्टी आहे, जी तर्क, प्रयोग आणि पुराव्यावर आधारलेली असते. भारतीय समाजात आजही अंधश्रद्धा, रूढी आणि अवैज्ञानिक विश्वास यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्रगती साधायची असेल तर वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना करणे गरजेचे आहे. समाजातील शिक्षण, माध्यमे आणि सार्वजनिक संवाद यामध्ये विज्ञानवादी विचार रुजविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

व्याख्यानादरम्यान त्यांनी विज्ञानवाद आणि मानवी मूल्ये यांचा संबंध स्पष्ट करताना, वैज्ञानिक दृष्टिकोन हा लोकशाही, समानता आणि मानवतावाद यांना बळकटी देणारा घटक असल्याचे सांगितले. त्यामुळे भारताच्या सर्वांगीण विकासासाठी विज्ञानवादी विचारसरणी स्वीकारणे अपरिहार्य असल्याचा निष्कर्ष त्यांनी मांडला.

महा न्यूज & व्ह्यूज




# प्रभावी पर्यावरण संवर्धन समन्वयातूनच शक्य

## शिवाजी विद्यापीठातील गोलमेज परिषदेतील सूर

**कोल्हापूर, ( महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज) :**

पर्यावरणाशी संबंधित कार्यरत संस्था, संघटनांनी समन्वय आणि सहकार्यातून एकत्रित काम केल्यास प्रभावी पर्यावरण संवर्धन शक्य आहे, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात झालेल्या गोलमेज परिषदेत उमटला.

शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग, विद्यापीठ विकास मंच आणि कोल्हापूर अर्थ वॉरियर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आज विद्यापीठात ही परिषद झाली.

या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून 'दै. सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनामध्ये जनजागृतीचे महत्त्वाचे साधन म्हणून प्रसारमाध्यमांची भूमिका अनन्यसाधारण असल्याचे सांगून ते म्हणाले, पर्यावरण संवर्धन ही आपल्या अस्तित्वाशी निगडित महत्त्वाची बाब आहे. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांची झपाट्याने होणारी घट ही गंभीर संकटे आपल्यासमोर उभी आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमे या प्रश्नाकडे समाजाचे सातत्याने लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. वृक्षारोपण, पाणीसंवर्धन आणि प्लास्टिकविरहित उपक्रम यांसारख्या कृतींमध्ये सहभागी होणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पर्यावरण टिकले, तरच भावी पिढ्यांना सुरक्षित आणि समृद्ध जीवनाची हमी आपण देऊ शकू, अन्यथा नाही.

अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन या बाबींना विद्यापीठाने नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. यामुळेच जलसंवर्धनाच्या माध्यमातून आज शिवाजी विद्यापीठ पूर्णपणे जलस्वयंपूर्ण झाले आहे. येथून पुढेही पर्यावरणीय संरक्षणासाठी विद्यापीठ नेहमीच सकारात्मक प्रयत्न करत राहील, असेही त्यांनी सांगितले.




गोलमेज परिषदेत विविध पर्यावरणीय मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. विशेषतः पाण्याचे प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, वृक्षतोड, प्लास्टिक संकलन, बांधकामातील खर मातीच्या व्यवस्थापनाबाबतचे प्रश्न यांसारख्या विषयांवर सहभागी संस्था प्रतिनिधींनी विचार मांडले. पर्यावरणाचे प्रश्न सोडवताना पर्यावरणविषयक कायदेशीर बाबींचा योग्य अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः तसेच घनकचरा व्यवस्थापन कायदा, २०२६ समजून घेऊन सध्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले. पर्यावरणीय प्रश्नांबाबत प्रशासनाकडून माहिती मिळविण्यासाठी माहितीचा अधिकार वापरण्यासही हरकत नसल्याचे सांगण्यात आले. पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी सर्व संस्थांनी एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता या निमित्ताने अधोरेखित झाली. विद्यापीठाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून प्रभावी कृती आराखडा तयार करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या परिषदेमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीला नवी दिशा मिळेल आणि विविध संस्थांमध्ये समन्वय वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

परिषदेत जिल्ह्यातील वृक्षप्रेमी वेल्फेअर, निरोगी व पर्यावरणपूरक प्रतिष्ठान, निसर्ग अंकुर, गार्डन्स क्लब, वसुंधरा निसर्ग संरक्षण संस्था, सजग नागरिक मंच, कल्पवृक्ष अॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, सायकल वेडे कोल्हापूर आदी १६ स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी मांडली. कार्यक्रमास पर्यावरण शास्त्र विभागातील डॉ. सोनल चोंडे, डॉ. पल्लवी भोसले यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे कोल्हापूर अर्थ वॉरियर्सच्या तृप्ती देशपांडे यांनी आभार मानले.